# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०१० ८८०५

दिनाकः- / /२०१०

30 DEC 2010

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र

पदवी अभ्यासक्रम संस्था तसेच

एमबीए/एमसीए पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रम संस्था

विषयः- सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात अकरावी व बारावी इयत्तेत असलेल्या मागासवर्गीय (अनुसूचित जमाती वगळून) विदयार्थ्यांच्या जातींच्या प्रमाणपत्रांच्या तपासणीसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भः-१. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग क्र.सीबीसी १०/२०१०/ प्र.क्र.५५/मावक दि.२९/११/२०१०

२. मा.संचालक ,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/मान्यता/२०१०/३४५७ दि.२०/१२/२०१०

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय सोबत जोडून पाठवित आहे. त्याचे अवलोकन व्हावे.

संदर्भिय शासननिर्णयान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००९-१० या वर्षात अकरावी व बारावी इयत्तेत असलेल्या व व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय (अनुसुचित जमाती वगळून) विदयार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी जानेवारी २०११ पर्यत मुदत वाढविलेली आहे.

सदरचा शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रकाशित करण्यासाठी(Cast Validity Certificate Extension Period January-2011)

सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात अकरावी व बारावी इयत्तेत असलेल्या मागासवर्गीय (अनु. जमाती वगळून) विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची तपासणीसाठी मुदतवाढ देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक सीबीसी १० /२०१०/ प्र.क्र. ५५ / मावक ५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२

दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१०

**वाचा :-** १) शा. नि. वि. जा. भ. ज. इ. मा. व. व वि. मा. प्रवर्ग कल्याण विभाग
क्र.सीबीसी-२०००/२५२/ प्र.क्र.१/इमाव ५, दिनांक २५.१.२०००

२) शा. नि. सामाजिक न्याय व विशेष सहाय, विभाग
क्र.सीबीसी-१०/२०१०/ प्र.क्र.५५/मावक ५, दिनांक ४.२.२०१०

३) शा. नि. सामाजिक न्याय व विशेष सहाय, विभाग
क्र.सीबीसी-१०/२०१०/ प्र.क्र.५५/मावक ५, दिनांक ११.५.२०१०

४) शा. नि. सामाजिक न्याय व विशेष सहाय, विभाग
क्र.सीबीसी-१०/२०१०/ प्र.क्र.५५/मावक ५, दिनांक ९.७.२०१०

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती / विमुक्त जाती / भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातींच्या विदयार्थ्यांनी विज्ञान शाखेच्या इयत्ता अकरावी व बारावी मध्ये शिकत असलेल्या तसेच यापूर्वी बारावी इयत्तेत विज्ञान शाखेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या जाती प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थांकडे अर्ज करण्याची अंतिम मुदत सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २००० अन्वये माहे, ३० नोव्हेंबर पर्यंत होती. तथापि या कालावधीमध्ये सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात इयत्ता बारावीमध्ये शिकत असलेल्या तसेच यापूर्वीच्या काळात बारावी इयत्तेत (विज्ञान शाखेत) उत्तीर्ण झालेल्या काही मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी वरील निर्धारित मुदतीत अर्ज सादर केले नसल्याने किंवा काही अपरिहार्य कारणामुळे त्यांना ते शक्य झाले नसल्याने, अशा विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांची जाती प्रमाणपत्राची तपासणी न झाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार अर्ज सादर करण्याची आणि त्याची पडताळणी करण्यास शासन निर्णय दिनांक ११ मे,२०१० अन्वये दिनांक ३० जून,२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि सदर वाढीव मुदतीमध्ये देखील काही मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने अशा विदयार्थ्यांना ३१ जुलै २०१० पर्यंत जाती दाव्याचे प्रस्ताव पडताळणी समितीस सादर करण्याबाबत दिनांक ९ जुलै २०१० च्या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच पडताळणी समितीने पुढील ३ महिन्यात प्रस्तावावर कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले होते.

राज्यात माहे डिसेंबर २०१० अखेर पर्यंत ग्राम पंचायतींच्या सुमारे १०,००० निवडणुका प्रस्तावित आहेत. या निवडणुकीसाठी मोठया प्रमाणात अर्ज त्या त्या समितीकडे प्राप्त झालेले आहेत. तसेच नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे अर्ज पडताळणी समिती कडे प्राप्त झाले होते. त्यामुळे विहित कालावधीमध्ये पडताळणी समितीस विदयार्थ्यांच्या बहुतांशी जाती दाव्याच्या प्रस्तावावर कार्यवाही करणे शक्य झाले नाही. विदयार्थ्यांनी १२ वी नंतर विविध व्यवसायीक अभ्यासक्रमांत प्रवेश हे ३ महिन्याच्या जाती दाव्याच्या अटीच्या अधीन राहून घेतलेले आहेत. सदर मुदत ही माहे नोव्हेंबर २०१० अखेर संपुष्टात येत आहे. जाती वैधता प्रमाणपत्रा अभावी विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून अशा विद्यार्थ्यांच्या जाती दाव्याची पडताळणी करण्यासाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात बारावी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या प्रत्येक मागास [illegible] बारावी विज्ञान शाखेत उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या ज्या विद्यार्थ्यांनी शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २००८ मध्ये विहित केलेल्या मुदतीत जाती प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी अर्ज सादर केले नाहीत. संदर्भ शासन निर्णय दिनांक ११ मे,२०१० अन्वये दिलेल्या वाढीव मुदतीत देखील अर्ज सादर केले नाहीत, व सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र व औषध निर्माणशास्त्र या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांचे जाती दाव्याचे प्रस्ताव पडताळणीसाठी आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेसह **दिनांक ३१ जुलै, २०१०** पर्यंत संबंधीत जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी स्विकारुन त्यावर पुढील ३ महिन्यामध्ये निर्णय घेऊन संबंधीत अर्जदारास कळविण्याबाबत दिनांक ६ जुलै, २०१० च्या शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले होते. आता शासनाकडे प्राप्त झालेल्या अशा विद्यार्थ्यांच्या जाती दाव्याच्या प्रस्तावांची पडताळणी करुन जानेवारी २०११ अखेरपर्यंत करण्यासाठी मुदतवाढ या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे. त्यानुसार या विभागातंर्गत असलेल्या पडताळणी समित्यांनी सदर मुदतीत कार्यवाही करुन निर्णय घेण्याबाबत आदेशित करण्यात येत आहे.

२. वरील मुदतवाढीची नोंद घेऊन त्याप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषि व पदुम विभाग यांनी कार्यवाही करावी.

३. प्रसिद्धी व जनसंपर्क महासंचालनालयाने या शासन निर्णयास राज्यस्तरावरील प्रमुख दैनिके, जिल्हा स्तरीय स्थानिक दैनिके, आकाशवाणी व दूरदर्शनद्वारे प्रसिद्धी देण्याची व्यवस्था करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक [illegible] असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ. म. राठोड )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त, (महसूल), अतिरिक्त आयुक्त (आदिवासी), अपर जिल्हाधिकारी (भापसे) मुंबई उपनगर, पुणे, नागपूर
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती व लातूर.
सहसंचालक (जा.प्र.प.) समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
विभागीय समाजकल्याण अधिकारी (जा.प्र.प.समिती) मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती, लातूर
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
संचालक, तंत्र शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
संचालक, आयुर्वेद संचालनालय, वरळी, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
प्रत :- प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांना वरील शासन निर्णयाची दखल घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

*****